वर्ष-०७ | अंक-३३ | मुंबई, मंगळवार ०६ ते १२ जुलै २०२१ | पृष्ठ-४

मूल्य २/- रुपये

# पोलीस बातमी पत्र

मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक • कार्यकारी संपादक : गुरु प्रसाद नाईक

PG 2 पुणे : दोघांनी हत्यार घेऊन काढलेले व्हिडियो सोशल मीडियावर टाकले अन्...

3 → 5 वर्षीय नातीवर बलात्कार करणाऱ्या नराधम आजोबाला 20 वर्षांची शिक्षा

कंत्राटी आरोग्य कर्मचाऱ्यांवर पोलिसांचा सौम्य लाठीमार ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

# मैत्री असली म्हणजे आम्ही भाजपसोबत सरकार बनवणार असं नाही-संजय राऊत



**राजकारणात मार्ग बदलतात पण मैत्री कायम राहते**

'भाजपासोबत कोणतेही शत्रुत्व नाही, राजकीय दृष्ट्या आमचे मार्ग वेगळे झाले आहेत. आमचे मार्ग वेगळे असले तरी आमच्यातील मैत्री आजूनही कायम आहे', असे शिवसेना खासदार संजय राऊत म्हणाले. तर सध्याची राजकीय परिस्थिती पाहता युती होऊ शकते का? यावर बोलताना त्यांनी असे म्हटले, मैत्री असली म्हणजे आम्ही भाजपासोबत सरकार बनवणार असं होत नाही. शिवसेनेसोबत कोणतंही शत्रुत्व नाही, युतीबाबत परिस्थितीनुसार निर्णय घेऊ, असे विधान रविवारी विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. त्यावर शिवसेना नेते संजय राऊत यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

यासह ते पुढे असेही म्हणाले की, सध्या आज राजकीय परिस्थिती काय आहे किंवा उद्या त्यात काय बदल होईल, हे आता कोणीही भविष्य वर्तवू शकत नाही. यासह महाराष्ट्रात जी राजकीय व्यवस्था आहे, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेससह आम्ही जे सरकार बनवलेलं आहे. त्यांचं उत्तम चाललं आहे. या सरकारचं स्वतः मुख्यमंत्री उद्धव ठाकरे नेतृत्व करत आहेत. त्यामुळे महाविकास आघाडीचं सरकार ५ वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करणार असल्याचेही स्पष्टपणे संजय राऊत यांनी सांगितले.

**असे म्हणाले होते फडणवीस**

शिवसेनेशी वैचारिक मतभेद आहेत, शत्रुत्व नाही, असे सूचक विधान करीत राजकारणात परिस्थितीनुसार निर्णय होतात आणि जर-तरला कोणताही अर्थ नसतो, असे वक्तव्य विधानसभेतील विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी केले.

**राऊतांचा फडणवीसांना टोला**

संजय राऊत यांनी माध्यमांशी बोलताना आमचे रस्ते वेगळे आहेत. पण मैत्री कायम आहे असे विधान केले. रविवारी देवेंद्रजींनी जे सांगितलं ते बरोबरच आहे. आमच्यात मतभेद आहेत. आम्ही इतकी वर्षे तेच सांगत होतो. आमचे आता मार्ग वेगळे झाले आहेत. रस्ते वेगळे आहेत. पण मैत्री कायम आहे.

याचा अर्थ असा नाही की आम्ही सरकार बनवू, असं सांगतानाच परिस्थितीनुसार युती होऊ शकते, याबाबत मला काही माहीत नाही.

# शिवसेनेशी शत्रुत्व नाही, वैचारिक मतभेद

मुंबई : शिवसेनेशी वैचारिक मतभेद आहेत, शत्रुत्व नाही, असे सूचक विधान करीत राजकारणात परिस्थितीनुसार निर्णय होतात आणि जर-तरला कोणताही अर्थ नसतो, असे प्रतिपादन विधानसभेतील विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी के ले. तसेच करोनाच्या नावाखाली विधिमंडळ अधिवेशनाचा फक्त दोन दिवसांचा कार्यक्र म निश्चित करून महाविकास आघाडीने लोकशाहीला कुलूप ठोकल्याचा आरोपही के ला. विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला भाजप नेत्यांची बैठक झाली. त्यानंतर पत्रकार परिषदेत बोलताना फडणवीस म्हणाले, करोना कालावधीत संसदेचे अधिवेशन ७० दिवस झाले असून राज्य विधिमंडळाचे अधिवेशन केवळ १४ दिवस झाले. करोना दिल्लीसह देशात



आहे. पण अन्य सर्व कार्यक्रम होत असताना व व्यवहार सुरू असताना जनतेच्या प्रश्नांवर आणि भ्रष्टाचाराच्या मुद्द्यांवर उत्तर देता येत नाही, म्हणून सरकारने अधिवेशनातून पळ काढला आहे. दोन दिवसांच्या अधिवेशनातही प्रश्न, लक्षवेधी किंवा कोणतेही संसदीय आयुध वापरता येणार नाही, आमदारांनी विचारलेले प्रश्न व्यपगत (समाप्त) करण्याचा ...पान २ वर...

# विनातिकीट रेल्वे प्रवाशांत वाढ



मुंबई: कार्यालयीन उपस्थितीत झालेली वाढ आणि लोकल प्रवासाची मुभा नसल्याने सर्वसामान्यांचे रस्ते प्रवास करताना होणारे हाल यामुळे अनेकजण उपनगरीय लोकलने विनातिकीट प्रवास करत असल्याचे निदर्शनास आले ...पान २ वर...

# 12 आमदारांच्या निलंबनावर फडणवीस संतापले

## ठाकरे सरकारवर केला गंभीर आरोप

मुंबई, पावसाळी अधिवेशनात तालिका अध्यक्षांवर धावून जाणे आणि गोंधळ घातल्याप्रकरणी भाजपच्या 12 आमदारांना निलंबित करण्यात आले आहे. या कारवाईवर भाजपचे कामकाजावर बहिष्कार घातला आहे. ठाकरे सरकारने स्टोरी तयार करून ही कारवाई केली आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया देवेंद्र फडणवीस यांनी दिली. 'Obc आरक्षणाच्या मुद्यावर आम्ही सरकारला उघडे पडले. त्यामुळे सरकारने खोटे आरोप ...पान २ वर...

# मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राकरिता स्तर -३ चे सर्व निर्बंध जसेच्या तसे लागु - पोलीस उपआयुक्त (मुख्यालय ) यांचे सि आर पी सी कलम १४४ प्रमाणे आदेश



कोरोना विषाणूच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने नोटिफिकेशन क्र. डीएमयु/२०२०/सीआर ९२/आपत्ती व्यवस्थापन -१ दिनांक ४/६/२०२१ अन्वये आदेश लागू केलेला असुन कोरोना विषाणु संसर्गाचा कमी झालेला प्रादुर्भाव लक्षात घेता राज्यात यापूर्वी लागु केलेल्या मनाई आदेशातील निर्बंधांमध्ये शिथिलता दिली आहे.

सदर आदेशास अनुसरून श्री. विजयकांत सागर , पोलीस उपआयुक्त (मुख्यलाय ) , मिरा भाईंदर , वसई विरार आयुक्तालय यांनी फौजदारी प्रक्रिया नुसार २८. ०६ .२०२१ रोजीचे सकाळी ७. ०० वाजे पासून दिनांक ०५/०७/२०२१ रोजीचे सकाळी ०७. ०० वाजे पर्यंत मनाई आदेश लागू केलेले होते . शासनाने निर्गमित केलेल्या उपरोक्त आदेशास अधिन राहूनमिरा भाईंदर , वसई विरार पोलीस आयुक्तालयातील कोविड संसर्गाचा तात्काळ प्रतिबंधक उपाय योजना म्हणून दिनांक १८/०६/२०२१ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या मनाई आदेशामध्ये मिरा भाईंदर मनगरपालिका क्षेत्र हे Levels of Restrictions For Breaking The Chain अंतर्गत स्तर -३ मध्ये समाविष्ट असल्याने या स्तराचे सर्व निर्बंध दिनांक ०४/०६/२०२१ रोजीचे शासन आदेशानुसार जसेच्या तसे लागू राहतील.

सदरचा मनाई आदेश हा दिनांक ५/७/२०२१ रोजीचे सकाळी ०७. ०० वाजल्यापासून दिनांक १२/०७/२०२१ रोजीचे सकाळी ०७. ०० वाजे पर्यंत मिरा भाईंदर , वासी विरार पोल्स आयुक्तलयातील मीरा भाईंदर महानगरपालिका हद्दी करिता लागू राहतील.

# 14 महिन्याच्या मुलीचे अपहरण करणाऱ्यास 6 तासामध्ये अटक करुन मुलीची सुटका, नवघर पोलीस स्टेशनची कामगिरी

भाईंदर : दिनांक ०१/०७/२०२१ रोजी नवघर पोलीस स्टेशन इथे फिर्यादीने त्यांचे पती व साथीदाराने आपल्या १४ महिन्याचा मुलीचे अपहरण करून कोठेतरी पळून गेलेले आहेत अशी रीतसर तक्रार केली . सदर घटनेबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने नवघर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला होतो. सदर गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन सदरचा गुन्हा उघडकीस येण्याकरिता वरिष्ठानी सूचना दिल्या होत्या . दिलेल्या सूचनेनुसार नवघर पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी सदर घटनेबाबत सविस्तर माहिती प्राप्त करून



तपास केला असता तपासामध्ये निदर्शनास आले कि , अपहरण झालेली मुलगी हिला तिचे वडील व त्याचा एक साथीदार (विधिसंघर्षित बालक) यांनी मिळुन भाईंदर पूर्व येथून अपहरण केल्याचे समजून आले. त्यावरून तांत्रिक बाबींचा आधार घेऊन माहिती मिळवली कि यातील आरोपी हे मुलीस घेऊन मुंबई सी .एस.एम. टी रेल्वे स्थानक येथून हावडा मुंबई मेलने त्यांचे मूळ गावी कांचीपुर , राज्य पश्चिम बंगाल येथे जाणार आहे . त्या अनुशंगाने तपस पथकाने सी .एस.एम. टी रेल्वे पोलीस , कल्याण रेल्वे पोलीस व ईगतपुरी रेल्वे पोलीस यांचेशी सातत्याने समन्वय साधून अपहृत मुलीस तिचे वडील व त्याचा साथीदार यांना ईगतपुरी रेल्वे स्थानकावर हावडा मुंबई मेल या गाडीतून ईगतपुरी रेल्वे पोलीस नाशिक ...पान २ वर...

# वेश्या व्यवसायावर कारवाई करुन 02 पीडित मुलींची केली सुटका, अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष भाईंदर पथकाची कामगिरी

मिरारोड : दिनांक २. ०७. २०२१ रोजी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाचे वपोनि. श्री. एस.एस. पाटील यांना गोपनीय माहिती मिळाली कि , ' वेश्यादलाल गीता वर्मा हि पुरुष गिऱ्हाईकांकडून पैसे स्विकारुन पुरुष ग्राहकांना वेश्यागमनाकरिता मुली असून मॉजिनीस केक शॉप , तुंगा हॉस्पिटल जवळ , मिरा भाईंदर रोड, मिरा रोड पूर्व या ठिकाणी वेश्यागमनाकरिता पुरुष गिऱ्हाईकांना मुली पुरविणार आहे.

त्यामुळे मिळालेल्या बातमीवरून वपोनि . श्री. पाटील यांनी पथकासह नमूद ठिकाणी बोगस गिऱ्हाईक व पंच यांना पाठवुन सत्यता पडताळून छापा टाकला असता महिला वेश्यादलाल गिता राजकुमार वर्मा



वय : २० रा. काशिमीरा मूळ रा. छत्तीसगड हि वेश्यागमनासाठी ग्राहकांकडून पैसे स्विकारुन मुली पुरवीत असतांना मिळून आल्याने तिचेकडून वेश्यागमनाकरिता स्विकारलेल्या रक्कमेसह ताब्यात घेवुन ०२ मुलींची सुटका करण्यात आली आहे . सदर बाबत महिला वेश्यदलाल हिचे विरुद्ध नवघर पोलीस ठाणे येथे पो.हवा उमेश पाटील यांनी सरकार तर्फे दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई डॉ . श्री. महेश पाटील , पोलीस उप.आयुक्त (गुन्हे) , श्री. रामचंद्र देशमुख , सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे ) यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षभाईंदर विभागाचे व.पो. नि . श्री. संपतराव पाटील , पोहवा. उमेश पाटील, रामचंद्र शिवाजी पाटील, म. पो. ना. यंम्बर , कमल चव्हाण, पो.शि. केशव शिंदे, चालक पोना . गावडे यांनी केली आहे.

# वाणगांव पोलीस ठाणे यांचे कडून अवैध दारु विक्री करणाऱ्या आरोपीवर कारवाई

वाणगांव : दिनांक ०४/०७/२०२१ रोजी ०७. ३० वाजताच्या सुमारास वाणगांव पोलीस ठाणे हद्दीत प्रोव्हिबिशन गुन्ह्यांचा माळ विक्री करीत बाळगला असल्याची गुप्त माहिती मिळाली होती . पोउनि / वेगवेगळ्या कपंनीच्या देशी व विदेशी प्रोव्हीबिशन गुन्ह्याचा माल विनापरवाना, बेकायदेशीर रित्या विक्री करण्याकरिता स्वतः जवळ बाळगला असताना मिळून आला. आरोपी याचे ताब्यातुन खालिलप्रमाणे



अल्पेश विशे यांनी मिळालेल्या माहितीच्या आधारे सदर ठिकाणी छापा टाकला असता एका मोकळ्या जागेत तसेच मौजे गुंगवाडा ता. डहाणू येथील मच्छिमार्केट जवळ चिंचेच्या झाडाखाली यातील आरोपी याने मुद्देमाल मिळून आला १)७७, २८० /- रु. किमतीचे एकुण २३ बॉक्स त्यात प्रत्येक बॉक्समध्ये एकुण ४८ इंपिरियल ब्ल्यू कंपनीची १८० मिलीच्या काचेच्या बाटल्या २) १८,०००/- ...पान २ वर...

# अपहरण केलेल्याची नीट काळजी घेणाऱ्याला जन्मठेपेची शिक्षा देता येणार नाही : सर्वोच्च न्यायालय

अपहरणाच्या प्रकरणाबाबत सर्वोच्च न्यायालयाने एक महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. जर अपहरणकर्त्याने अपहरण केलेल्या व्यक्तीवर प्राणघातक हल्ला केला नाही ,त्याला जिवे मारण्याची धमकी दिली नाही आणि त्याच्याशी चांगले वर्तन केले तर अपहरणकर्त्यास भारतीय दंड संहितेच्या कलम ३६४ अ नुसार जन्मठेपेची शिक्षा दिली जाऊ शकत नाही असे सुप्रीम कोर्टाने म्हटले आहे. न्यायमूर्ती अशोक भूषण आणि न्यायमूर्ती आर. सुभाष रेड्डी यांच्या खंडपीठाने तेलंगणा उच्च न्यायालयाने अपहरण प्रकरणात वाहन चालक आरोपीला दोषी ठरविण्याचा निर्णय बाजूला ठेवत हे निरीक्षण ठेवले. रिक्षा चालकाने एका अल्पवयीन मुलीचे अपहरण केले होते आणि तिच्या वडिलांकडे २ लाख रुपयांची खंडणी मागितली होती.



**दोषी ठरवण्यासाठी तीन गोष्टी सिद्ध कराव्या लागतील**

"कलम ३६४ अ (अपहरण आणि खंडणी) अंतर्गत आरोपींना दोषी ठरवण्यासाठी तीन गोष्टी सिद्ध करणे आवश्यक आहे. या तीन गोष्टी म्हणजे- एखाद्या व्यक्तीचे अपहरण करणे किंवा त्याला ओलिस ठेवणे, अपहरणकर्त्याला जिवे मारण्याची धमकी देणे किंवा मारहाण करणे, अपहरणकर्त्याकडून असे काही करणे की ज्यामुळे सरकार, इतर कोणत्याही देशाला किंवा कोणत्याही पीडित व्यक्तीला धोका होऊ शकते किंवा ठार मारले जाऊ शकते अशी भीती व्यक्त होणे. सरकारी संस्थेवर किंवा दुसऱ्या व्यक्तीवर खंडणी देण्यासाठी दबाव आणला गेला हे सिद्ध करावे लागेल असे कोर्टाने म्हटले आहे.

कलम ४६४ अ अंतर्गत जन्मठेपेची शिक्षा किंवा फाशीची शिक्षा ठोठावताना पहिल्या अटी व्यतिरिक्त दुसरी किंवा तिसरी अटदेखील सिद्ध करावी लागेल, अन्यथा एखाद्याला या कलमान्वये दोषी ठरवले जाऊ शकत नाही असे कोर्टाने सांगितले.

**हायकोर्टाने फेटाळून लावली होती याचिका**

उच्च न्यायालयाच्या आदेशाला आव्हान देत तेलंगाना येथील रहिवासी शेख अहमद यांच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालय सुनावणी घेण्यात आली. या शिक्षेविरूद्ध अहमदची याचिका हायकोर्टाने फेटाळून लावत त्याला आयपीसीच्या कलम ३६४ अ नुसार जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. घरी सोडण्याच्या ...पान २ वर...

पोलीस बातमी पत्र

मुंबई

२

मुंबई, मंगळवार ०६ ते १२ जुलै २०२१

# पोलिसांना बघताच आरोपीची 4थ्या मजल्यावरुन उडी



ठाणे : ठाणे जिल्ह्यात एका गुन्हेगाराला पकडण्यासाठी गेलेल्या पोलीस कर्मचाऱ्यावर जमावाने केल्याने तीन पोलीस जखमी झाले असल्याची माहिती समोर आली आहे. रविवारी अधिकाऱ्यांनी ही माहिती दिली. गुजरात पोलीस आणि भिवंडी गुन्हे शाखेचे संयुक्त पथक जमील कुरेशी (38) याच्या शोधात साध्या कपड्यात गेले असता हा हल्ला करण्यात आला. शुक्रवारी भिवंडी शहरातील कसई वाडा येथे ही घटना घडली.

अटक टाळण्यासाठी कुरेशी याने चौथ्या मजल्यावरील घराच्या खिडकीतून उडी मारली आणि त्याचा मृत्यू झाला, अशी माहिती भिवंडी परिसरातील उपायुक्त योगेश चव्हाण यांनी दिली. यावेळी मृताचे कुटुंबीय व स्थानिक लोक बाहेर आले आणि पोलिसांनी त्याचा जीव घेतल्याचा आरोप केला. संतप्त जमावाने काही पोलिसांना मारहाण केली अशी माहिती अधिकाऱ्याने दिली आहे.याचे काही व्हिडिओही व्हायरल झाले असून यामध्ये असंख्य पुरुष आणि महिला पोलिसांना मारहाण करीत आणि दगडफेक करताना दिसत आहेत. हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. या घटनेत भिवंडी पोलीस दलातील एक सब इन्स्पेक्टर आणि दोन कॉन्स्टेबल जखमी झाले असून त्यांना स्थानिक रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले आहे. निजामपुरा पोलिसांनी गुन्हेगारांची ओळख पटवून भारतीय दंड संहिता (आयपीसी) च्या संबंधित कलमांतर्गत दंगा, मारहाण किंवा गुन्हेगारी शक्तीचा वापर आणि सरकारी सेवकाला कर्तव्य बजावण्यापासून रोखण्यासाठी चुकीचा संयम यासह गुन्हा दाखल केला आहे. 'हा संवेदनशील भाग आहे. म्हणून कायदा व सुव्यवस्था राखत असताना पोलीस योग्य कारवाई करतील' असे अधिकाऱ्यांनी सांगितलं.

# पुणे : दोघांनी हत्यार घेऊन काढलेले व्हिडियो सोशल मीडियावर टाकले अन्...

हडपसर परिसरातील दोन जणांनी सोशल मीडियावर हत्यार घेऊन काढलेले व्हिडियो सोशल मीडियावर टाकल्यानंतर त्यांना गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अटक केली आहे. तलवारीने केक कापणे, पिस्तूल व इतर शस्त्र हातामध्ये घेऊन काढलेला फोटो किंवा व्हिडिओचा स्टेट्स ठेवणे किंवा ते सोशल मीडियावर टाकण्याचे प्रकार वाढत आहेत. त्यामुळे असे प्रकार करणाऱ्यांवर पोलिसांनी कारवाई करण्यास सुरुवात केली आहे.

नितीन सुंदर दहीरे (वय २२) आणि अनिकेत अशोक कुंदर (वय २२, रा. दोघेही हडपसर) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. या दोघांनी पालघन व तलवार हातामध्ये घेऊन उभा असल्याचा व्हिडियो सोशल मीडियावर



टाकला होता. त्यामुळे परिसरात दहशत निर्माण झाली होती. हे दोघे हडपसर येथील हिंगणे मळा परिसरात राहत असल्याची माहिती गुन्हे शाखा सहाच्या पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिस निरीक्षक गणेश माने यांच्या पथकाने दोघांना अटक केली. त्याच्यावर हडपसर पोलिस ठाण्यात भारतीय हत्यार कायदा कमल ४ (२५) व महाराष्ट्र पोलिस कलम कायदा ३७ (१) सह १३५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वाघोली येथील तरुणाने हातात पालघन घेऊन तयार केलेला व्हिडियो सोशल मीडियावर टाकला होता. त्यामुळे त्याची परिसरात दहशत निर्माण झाली होती. हा तरुण वाघोली गायरान झोपडपट्टी परिसरात येणार असल्याची माहिती मिळाल्यानंतर त्याला अटक करण्यात आली. त्याच्यावर लोणीकंद पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, अशी माहिती वरिष्ठ पोलिस निरीक्षक गणेश माने यांनी दिली.

काही दिवसांपूर्वी चंदननगर परिसरातील अनिकेत साठे याने कोयता हातामध्ये घेऊन काढलेला फोटो व्हॉट्सॲपच्या स्टेट्स ठेवला होता. त्याला गुन्हे शाखेच्या युनिट पाचने अटक केली होती. त्याच्यावर चंदननगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हे शाखेच्या युनिट एकने तलवारीने केक कापणाऱ्यास महिन्यांपूर्वी अटक केली होती.

गुन्हे शाखेला कारवाईचे आदेश

'सोशल मीडियावर शस्त्र घेऊन उभा असल्याचे स्टेट्स काही जण ठेवत असल्याचे दिसून येत आहे. काही जण त्यांच्या सोशल मीडियाच्या अकाउंटवर शस्त्र घेऊन उभे असलेले फोटो, व्हिडियो टाकत आहेत. अशा गुन्हेगारांची माहिती काढून त्यांच्यावर कारवाईचे आदेश दिले आहेत. त्यानुसार गुन्हे शाखेच्या पोलिसांनी असे स्टेट्स, व्हिडियो टाकणाऱ्यांवर कडक कारवाईला सुरुवात केली आहे,' अशी माहिती गुन्हे शाखेचे अतिरिक्त आयुक्त अशोक मोराळे यांनी दिली.

# नाशिक जिल्ह्यातील चार तालुके झाले टँकरमुक्त



स्थानिक जलस्त्रोत आटल्याने जिल्ह्यातील काही गावांत एप्रिल महिन्यात पाण्याची टंचाई जाणवू लागली. पिण्यासाठी आणि वापरासाठीही पुरेसे पाणी उपलब्ध होत नसल्याने हंडाभर पाण्यासाठी नागरिकांची वणवण होत होती.

पाण्यासाठीची भटकंती थांबावी याकरीता टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात यावा अशी मागणी होऊ लागली.

त्यानुसार जिल्ह्यात १० तालुक्यांत तब्बल ५९ टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत होता. परंतु जून महिन्यात काही तालुके आणि गावांत झालेल्या पावसामुळे स्थानिक पातळीवरच पाण्याची उपलब्धता होऊ लागली आहे.

त्यामुळे टप्प्याटप्प्याने टँकरची मागणी कमी होऊ लागल्याने जिल्ह्यात सद्यस्थितीत केवळ २७ टँकरच पाणीपुरवठ्यासाठी धावत आहेत. पेठ तालुक्यातील आठ गावे आणि सहा वाड्या, त्र्यंबकेश्वर तालुक्यातील एक गाव आणि सात वाड्या तर सुरगाणा तालुक्यातील १२ गावे याठिकाणी अनुक्रमे सात, दोन आणि पाच टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत होता. परंतु या तीनही तालुक्यांमध्ये संबंधित गावांत पुरेशा पाण्याची उपलब्धता झाल्याने येथील टँकर बंद करण्यात आले आहेत. याशिवाय इगतपुरी तालुक्यात आठ वाड्यांवर तीन टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत होता. परंतु येथील टँकरही बंद करण्यात आले आहेत.

# उपवन तलावात पोहण्याचा मोह जीवावर बेतला; तरुणाचा मृत्यू



ठाणे : शहरातील उपवन तलावात पोहण्यासाठी उतरलेल्या दोन तरुणांपैकी एका तरुणाचा बुडून मृत्यू झाला आहे. तलावात बुडून मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव सोहेल बेग असून तो ठाण्यातील हाजुरी परिसरात राहतो. सोहेल आणि अन्य एक तरुण असे दोघे जण शनिवारी सायंकाळी ५.३० वाजता तलावात पोहण्यासाठी उतरले. परंतु सोहेल याला पोहायला येत नसल्याने तो पाण्यात बुडाला. याबाबतची माहिती मिळाल्यानंतर प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी, पोलिस आणि टीडीआरएफच्या पथकाने धाव घेतली आणि सोहेलचा तलावात शोध घेण्यास सुरुवात केली. अनेक तास हे शोधकार्य सुरु होतं. त्यानंतर रात्री उशिरा पोलिसांना सोहेल बेग याचा मृतदेह आढळला.

# आईचा खून करून काळीज खाण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला कोर्टाने ठरवलं दोषी

कोल्हापूर : दारू पिण्यासाठी पैसे देत नाही म्हणून आईचा क्रूरपणे खून करुन शरीरातील अवयव भाजून खाण्याच्या तयारीत असलेला कोल्हापुरातील आरोपी सुनील रामा कुचकुरवी याला जिल्हा सत्र न्यायाधीश महेश जाधव यांनी दोषी ठरवले आहे. मंगळवारी (ता. ६) दोन्ही बाजूचा युक्तीवाद झाल्यानंतर कोर्ट निकाल देणार आहे.

नेमकं काय आहे प्रकरण?

२८ ऑगस्ट २०१७ राजी शाहूपुरी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील माकडवाला वसाहतीत आरोपी सुनील कुचकोरवी याने आई यल्लवा रामा कुचकोरवी (वय ६२, रा. माकडवाला वसाहत) हिचा खून केला. दारु पिण्यासाठी पैसे देत नाही या कारणावरुन त्याने जन्मदात्या आईला संपवलं. चाकू, सुरी आणि सत्तूर या हत्यारांनी आईच्या अंगावर ठिकाठिकाणी वार केले होते. आईच्या शरीराचे तुकडे करून ते भाजून खाण्याच्या तयारीत असताना त्याला अटक करण्यात आली होती.

या गुन्ह्याचा तपास तत्कालीन शाहूपुरी पोलिस निरीक्षक एस.एस. मोरे यांनी केला. त्यानंतर दोषारोपपत्र कोर्टात



पाठवण्यात आले.

या खटल्याची सुनावणी जिल्हा कोर्टात जिल्हा सत्र न्यायाधीश महेश जाधव यांच्यासमोर सुरू आहे. सरकारी वकील ॲड विवेक शुक्ल यांनी १२ साक्षीदार तपासले. खुनाच्या गुन्ह्यात कोणताही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नसतानाही परिस्थितीजन्य पुराव्यावरुन कोर्टाने आरोपीस दोषी ठरवले.

कोर्टाने आरोपीस शिक्षा देण्यासाठी सहा जुलै रोजी सुनावणी ठेवली असून दोन्ही पक्षाच्या तक्रारी ऐकून त्याच दिवशी शिक्षा देण्यात येणार आहे. या खटल्यासाठी सहाय्यक पोलिस निरीक्षक एम.एम. नाईक, पोलिस हेड कॉन्स्टेबल सुरेश परीट, श्री लोहार यांचे सहकार्य लाभले.

# ऑनलाइन विक्रेत्यांवर कारवाई करणार



ऑनलाइन तलवार विक्री प्रकरणात पोलिसांनी ऑनलाइन पोर्टलवरही लक्ष वळवले आहे. या प्रकरणात इरफान खान याने तलवारी तसेच अन्य शस्त्रे ही एका ऑनलाइन पोर्टलवरून खरेदी केल्याची माहिती समोर आली आहे.

अजूनही शो पीस म्हणून अनेक ऑनलाइन कंपन्या या तलवारी विक्री करीत आहेत. अशा तलवारी विकणाऱ्या आणि त्या समाजात वितरीत करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार असल्याचे संकेतही पोलिस उपायुक्त दीपक गिऱ्हे यांनी दिले. या प्रकरणात अरमान इंटरप्रायजेस या कंपनीने लाकडी खेळण्याच्या नावाखाली तलवारी पाठवून सरकारची फसवणूक केल्याप्रकरणी कंपनी विरोधही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यापूर्वी शहरात तलवारी सापडल्याच्या काही घटना समोर आल्या होत्या. त्यावेळी बाहुबलीची तलवार प्रसिद्ध झाली होती. या तलवारीची विक्री ऑनलाइन विकण्यात येत होती.

या प्रकरणी तत्कालीन पोलिस आयुक्त कार्यालयाचे जनसंपर्क अधिकारी घनश्याम सोनवणे यांनी कारवाई केली होती. या प्रकरणात एकूण २४ जणांवर कारवाई करण्यात आली होती. मात्र, मोठ्या कंपनीच्या अधिकाऱ्यांनी या प्रकरणात अटकपूर्व जामीन घेतला होता. या प्रकरणात नंतर कोणतीही कारवाई झाली नाही.

**तलवारीने हल्ल्याच्या घटना नेहमीच्या**

शहरामध्ये भांडण आणि हाणामारीच्या घटनांमध्ये तलवारीचा वापर सर्रास होत असल्याचे दिसून आले आहे. पानचक्की येथे एका परिसरात राहणाऱ्या दोन परिवारात भांडणे झाली. यात तलवारीने वार करण्यात आला.

अशीच घटना सातारा परिसरात घडली. तर बेगमपुरा आणि छावणी येथेही अशा घटना घडलेल्या आहेत. या प्रकरणातही तलवारी कोठून आल्या? याचा शोध अजूनही पुर्ण झालेला नाही.

**तरुणांमधील आकर्षण धोक्याचे**

शहरातील तरुणांमध्ये तलवारी आणि अन्य शस्त्रांविषयी आकर्षण वाढत आहे. गेल्या दोन महिन्यांमध्ये शस्त्रास्त्रांविषयी शहरात गुन्हेही दाखल झाले आहेत. या प्रकरणामध्ये तलवारी कोठून आल्या, याचा तपास फारसा पुढे सरकलेला नाही.

## पृष्ठ १ वरुन

### 14 महिन्याच्या मुलीचे अपहरण करणाऱ्यास

यांच्या मदतीने ताब्यात घेतले. नमूद गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेवून नवघर पोलिसांनी सदरचा गुन्हा अवघा ६ तासात उघडकीस आणून अपहरण केलेल्या मुलीस फिर्यादी यांचे ताब्यात दिले आहे. तसेच सदर गुन्ह्याचा पुढे तपास सपोनि. आरती गवारे , नवघर पोलीस ठाणे ह्या करीत आहेत . सदरची कामगिरी श्री. अमीत काळे, पोलीस उप आयुक्त , परिमंडळ -०१, व डॉ . शशिकांत भोसले , सहा . पो. आयुक्त , यांचे मार्गदर्शनाखाली श्री. मिलींद देसाई , वरिष्ठ पोलीस निरीक्षक , नवघर पोलीस ठाणे , पोनि . प्रकाश मासाळ (गुन्हे), सपोनि . भास्कर पुल्ली . योगेश काळे . पोउनि . संदीप ओहळ , पोना. रविंद्र भालेराव , पोना . एन्नोद्दिन शेख , पोशि. अनिल सुर्वे , पोशि.संदीप जाधव यांनी केली आहे.

### वाणगांव पोलीस ठाणे यांचे

रुपये किंमतीचे एकुण ५ बॉक्स त्यात प्रत्येक बॉक्समध्ये एकुण १२ रॉयल स्टँग कंपनीची ७५० मिलीच्या काचेच्या बाटल्या ३) ९०,०००/- रुपये किंमतीच्या सफेद रंगाची टाटा इंडिगो कंपनीची एम.एच. सीजे -१३८०अश्या वर्णनाची कार असा एकुण १,८५,२८०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदरचे आरोपी यांच्या विरुद्ध वाणगांव पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असुन पुढील तपास चालू आहे. सदरची कारवाई सपोनि / श्रीकांत शिंदे , प्रभारी अधिकारी वाणगांव पोलीस ठाणे यांचे मार्दर्शनाखाली पोउनि. अल्पेश विशे ,वाणगांव पोलीस ठाणे यांनी व पोलीस अंमलदार यांनी केली आहे.

### शिवसेनेशी शत्रुत्व

निर्णय सरकारने घेतला आहे. त्यामुळे लेखी उत्तरेही सरकारला द्यायची नाहीत. पुरवणी मागण्यांवरही तरतुदींच्या संदर्भानेच बोलण्याचे बंधन घालण्यात आले आहे. राज्याच्या गेल्या ६० वर्षांच्या इतिहासात असे कधी झाले नाही. त्यामुळे विधिमंडळात जमतील तेवढे प्रश्न मांडू, अन्यथा आंदोलनेही करावी लागतील. भाजप नेते आमदार आशीष शेलार आणि शिवसेना प्रवक्ते खासदार संजय राऊत यांची शनिवारी बैठक झाल्याचा दावा काही प्रसिद्धीमाध्यमांमधून करण्यात आला. त्याबाबत विचारता फडणवीस म्हणाले, कोणाची भेट झाली का, ते माहीत नाही. आमच्यात कोणतीही अधिकृत चर्चा सुरू नाही. कोणी कोणालाही भेटू शकते. शिवसेनेशी आमचे शत्रुत्व नाही. आमचे काही बांधावरून वाद नाहीत, की त्यांनी आमच्या हद्दीत अतिक्रमण केले. आमच्या मदतीने युतीत असताना निवडून आल्यावर दुसऱ्याचा हात धरून निघून गेले, हा आमचा वाद आहे. राज्य सरकारला उशिरा जाग ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावर फडणवीस म्हणाले, राज्य सरकारला दीड वर्ष उशिराने शहाणपण सुचले आणि आता राज्य मागासवर्ग आयोगाला सांख्यिकी तपशील (इम्पिरिकल डाटा) तयार करण्याचे काम देण्यात आले आहे. आधी केंद्र सरकारवर खापर फोडून जनगणनेचा तपशील देत नसल्याचे कारण दिले जात होते. पण जनगणनेच्या माहितीमध्ये देशात आठ कोटी तर राज्यात सुमारे ७० लाख चुका आहेत. त्या दुरुस्त करण्यासाठी केंद्र सरकारने समिती नेमली असून अद्याप पुढे निर्णय झाले नाहीत. त्यामुळे आमच्या सरकारच्या काळातही तो मिळाला नाही. पण त्या माहितीची गरज नसून मराठा आरक्षणाच्या वेळी आमच्या सरकारने खासगी संस्था नेमून हा डाटा तयार केला, त्याप्रमाणे कृती करण्याची गरज आहे. केंद्राकडे पोट दाखविण्याची गरज नाही. सरकारने वेळीच कृती केली असती, तर किमान ५० टक्क्यांच्या आतील आरक्षण वाचले असते.

महाविकास आघाडी सरकारने प्रसिद्धीवर २४६ कोटी रुपये खर्च केले असल्याच्या मुद्द्यावर बोलताना आमच्या सरकारने पहिल्या वर्षी केवळ २६ कोटी रुपये खर्च केल्याचे सांगितले. कोणताही कामे होत नसताना प्रसिद्धी कोणाची न कशाची करीत आहेत, याचा तपशील जनतेपुढे मांडावा, अशी मागणीही के ली. लोकसेवा आयोगाचा कारभार सुधारावा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षा उत्तीर्ण होऊनही दीड वर्ष मुलाखत होत नसल्याने व नोकरी मिळत नसल्याने निराश होवून आत्महत्या केलेल्या तरूणाचे प्रकरण गंभीर आहे. लोकसेवा आयोग स्वायत्त असला तरी त्याला स्वैराचाराचे स्वातंत्र्य नाही. राज्य सरकारने आयोगाच्या कारभारावर लक्ष देवून तो सुधारावा, असे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. राज्य सरकारने आयोगाच्या सदस्यांच्या नियुक्त्या केलेल्या नाहीत. त्या तातडीने व्हाव्यात, अशी मागणीही त्यांनी के ली.

### अपहरण केलेल्याची नीट काळजी

बहाण्याने रिक्षा चालकाने केले होते अपहरण

रिक्षा चालक अहमदने घरी सोडण्याच्या बहाण्याने सेंट मेरी हायस्कूलच्या इयत्ता सहावीच्या विद्यार्थीनीचे अपहरण केले होते. मुलीचे वडील खंडणी देण्यासाठी गेले असता पोलिसांनी मुलीला वाचवले होते. ही घटना २०११ रोजी घडली पीडितेचे वय १३ वर्षे होते. पीडित मुलीच्या वडिलांनी कोर्टात सांगितले होते की अपहरणकर्त्याने मुलीला कधी इजा करण्याची किंवा जिवे मारण्याची धमकी दिली नव्हती.

### 12 आमदारांच्या निलंबनावर

लावून आमच्या आमदारांना निलंबित केले आहे. आमच्या 106 आमदारांना निलंबित केले तरी आम्ही लढत राहू. आमचे एक वर्ष काय पाच वर्ष जरी निलंबित केलं तरी काही फरक पडत नाही. माझ्यावर हक्काभंग आणला तरी काही फरत पडत नाही, असं फडणवीस म्हणाले. 'आज सभागृहात पहिल्यांदा बाचाबाची झाली नाही. अध्यक्षांच्या दालनात वाद होत असतो. तरी कुणीला निलंबित करत नाही. पण स्टोरी तयार करून कारवाई करण्यात आली. भाजपच्या एकाही आमदाराने शिवी दिली नाही. शिवसेनेचे काही आमदार येवून वाद घातला. त्यावेळी शेलार यांनी वाद मिटवला आणि आम्ही गळाभेट घेवून बाहेर आलो', असंही फडणवीस यांनी सांगितलं. 'आमचे आमदार कमी करण्यासाठी या सरकारने प्रयत्न केला आहे. खरं म्हणजे, मराठा समाजाला फसवणूक करण्याचे काम चालले आहे. यात सरकार फेल गेले आहे. सरकार खोटे बोलत आहे. केंद्राकडे रिपोर्ट पाठवण्याचे काम सुरू आहे. पण रिपोर्ट सांगतो की, आधी सरकारला मागास आयोग तयार करावा लागेल. यांचं असं आहे की, लग्न झालं नाही पण बारश्याची तयारी आहे', अशी टीकाही फडणवीसांनी केली.

'ही कारवाई केल्या शिवाय केंद्राकडे कोणताही ठराव पाठवून उपयोग नाही. ठाकरे सरकारच कमिशनच त्यांना सांगते, पण हे बाहेर खोटे सांगत आहे. या सरकारला स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका होईपर्यंत ओबीसी आरक्षण द्यायचे नाही', असा आरोपही फडणवीसांनी केला.

### विनातिकीट रेल्वे प्रवाशांत वाढ

आहे. मध्य रेल्वे उपनगरीय मार्गावर १ लाख २ हजार ३४२ प्रवाशांना, तर पश्चिम रेल्वे उपनगरीय मार्गावर २९ हजार ५५५ प्रवाशांना विनातिकीट पकडण्यात आल्याची माहिती रेल्वेच्या सूत्रांनी दिली. यात बहुतांश सामान्य प्रवासी आहेत. अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांची संख्या अत्यल्पच असते, असे सांगण्यात आले.

सामान्य प्रवाशांना प्रवासाची मुभा नसल्याने ते रेल्वेप्रवासाचा प्रयत्न करतात. त्यामुळे पकडण्यात येणाऱ्या या प्रवाशांची संख्या अधिक असल्याचे सूत्रांनी सांगितले. अत्यावश्यक सेवा कर्मचाऱ्यांसाठीच सुरू असलेल्या लोकलमुळे सर्वसामान्य प्रवाशांचे हाल होत आहेत. स्थानकाच्या प्रवेशद्वारांवर तैनात नसलेले पोलीस ओळखपत्रे तपासून प्रवाशांना स्थानकात सोडत नाहीत. त्याचबरोबर काही स्थानकात तिकीट देतानाही ओळखपत्र तपासले जात नाही. तर काहीजण तिकीट दिले जाणार नाही, म्हणून विनातिकीच प्रवास करतात. परिणामी लोकलमध्ये प्रवाशांची संख्या वाढल्याचे सांगण्यात आले. एप्रिल २०२१ ते जून २०२१ या तीन महिन्यात तब्बल १ लाख ३१ हजार ८९७ विना तिकीट प्रवाशांवर कारवाई करण्यात आली. तसेच दोन महिन्यांत ४ हजार ओळखपत्र रेल्वेने जप्त केली आहेत.



## संपादकीय...

# शंभरीतले आव्हान..

'एक भयकारी आव्हान', 'दु:खाची किनार असलेला वाढदिवस', 'शून्य ऐतिहासिक स्मृती', 'शक्तिशाली, तरीही दुबळा' अशी भाष्ये जागतिक माध्यमांनी चिनी कम्युनिस्ट पक्षाच्या (सीसीपी) शताब्दीनिमित्त केली आहेत. बीजिंगमधील ज्या तिआनानमेन चौकात सुमारे ३२ वर्षांपूर्वी विद्यार्थ्यांचे लोकशाही आंदोलन निर्दयपणे चिरडण्यात आले, त्या ठिकाणीच 'सीसीपी'चा शंभरावा वाढदिवस साजरा करणे हा योगायोग होता की जागतिक इशारा, याचा जागतिक माध्यमांनी वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

''चीनची वाढ कोणताही देश थांबवू शकला नाही, परंतु ज्यांनी तसे धाडस केले त्यांनी १४० कोटी चिनी नागरिकांच्या रक्ताने उभारलेल्या महान पोलादी भिंतीवर रक्तपातच पाहिला,'' असे जाज्वल्य विधान चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग यांनी 'सीसीपी'च्या शताब्दी समारंभात केले. त्याच्या संदर्भाने इटलीतील 'कुरियर देला सेरा (इव्हनिंग कुरियर)'ने टिप्पणी केली आहे. 'जिनपिंग यांच्या भाषणातील वृत्तांकनातून रक्तपात हा उल्लेख वगळला असला, तरी तेथे उपस्थित जनसागराने तो शब्द ऐकला आणि टाळ्यांचा कडकडाटही केला.



परंतु तिआनानमेन चौकातील रक्तपाताची साधी स्मृतीही त्या कडकडाटात नव्हती,' असा खेद व्यक्त करीत 'सीसीपी'च्या शताब्दीचे वर्णन या वृत्तपत्राने 'शून्य ऐतिहासिक स्मृती' असे केले आहे. 'द न्यू यॉर्क टाइम्स'मधील लेखात 'हाँगकाँग इकॉनॉमिक जर्नल'चे माजी मुख्य संपादक यी-झेंग लिआन यांनी चिनी कम्युनिस्ट साम्राज्य संपुष्टात येण्याऐवजी ते पाश्चात्त्यांपुढे भयकारी आव्हान म्हणून कसे उभे ठाकले आहे, याची मांडणी केली आहे.

'चीनमध्येही मध्यमवर्गाची वाढ होऊन तो वर्ग चीनला लोकशाही व्यवस्थेच्या दिशेने नेईल, हा समज पाश्चिमात्यांना महागात पडला. त्याची परिणती त्यांच्या ४५ वर्षांच्या धोरणांतील अपयशात झाली. आता शतकभर मागे वळून पाहिले तर अनेक चिनी लोकांनी आपले आयुष्य आणि स्वातंत्र्य स्वाहा केल्याचे दिसेल आणि भविष्याचा वेध घेतला तर पाश्चात्त्यांसाठी चीन हे एक आव्हान असल्याचे निदर्शनास येईल,' असे विश्लेषण या लेखात केले आहे.

'लॉस एंजलिस टाइम्स'च्या अग्रलेखात चिनी कम्युनिस्ट पक्षाच्या शंभरीला 'अनहॅप्पी बर्थडे' असे संबोधले आहे. 'आर्थिक उदारीकरणातून चीनमध्ये राजकीय सुधारणा होतील, तेथे बहुपक्षीय लोकशाहीचा उदय होईल, ही आशा तिआनानमेन चौकातील आंदोलनाबरोबरच चिरडून टाकण्यात आली,' असे भाष्यही या संपादकीयात केले आहे. ''सीसीपी'ने आपल्या मृत्यूचे अंदाज खोटे ठरवण्यासाठी सातत्यपूर्ण काम केले, आपला प्रभाव वाढवला. परंतु त्या पक्षाने कितीही चांगले काम केले असले, तरी तो त्याने घडवलेल्या मनुष्यसंहारामुळेच ओळखला जातो,' अशी टीकाही या अग्रलेखात आहे.

'आजवर अनेकांनी- चिनी कम्युनिस्ट पक्षाचा मृत्यू अटळ आहे, यावर पैज लावली आणि ते हरत आले आहेत. चँग-कै-शेक (चिनी राष्ट्रवादी पक्षाचे नेते आणि चीनचे माजी अध्यक्ष) यांचे राष्ट्रवादी समर्थक, मुक्त बाजारपेठ आणि इंटरनेट यांपैकी कुणीही चिनी कम्युनिस्ट साम्राज्याचा पाडाव करू शकले नाही,' असे निरीक्षण नोंदवताना ब्रिटनच्या 'द गार्डियन'ने- 'चिनी कम्युनिस्ट दिसतात त्यापेक्षा दुर्बल आहेत,' अशी टिप्पणी केली आहे. 'शंभर वर्षांत चिनी लोकांच्या मनात बदल घडवून आणला गेला, त्यांचे प्राक्तन बदलण्यात आले, परंतु त्यांच्यावर विश्वास दाखवला गेला नाही, त्यांना अभिव्यक्तिस्वातंत्र्य दिले गेले नाही किंवा त्यांना त्यांचा नेता निवडण्याचा अधिकारही दिला गेला नाही,' अशी खंतही या वृत्तपत्राने व्यक्त केली आहे.

'फ्रँकफर्टर अल्गेमायने त्सायटुंग (फ्रँकफर्ट जनरल न्यूजपेपर)' या जर्मन वृत्तपत्राने थोडा वेगळा सूर लावला आहे. 'चीनला अद्यापही साथीदारांची गरज आहे,' असे मत मांडताना चीनच्या उदयात पाश्चिमात्य देशांनीही महत्त्वपूर्ण भूमिका बजावल्याचे म्हटले आहे. 'जे काही साध्य केले गेले आहे, त्यापैकी बहुतेक जिनपिंग यांच्या 'एकला चलो रे' मानसिकतेमुळे पुन्हा गमावले जात आहे. चीन मजबूत आहे, हे जिनपिंग यांचे म्हणणे योग्य असले तरी साथीदारांशिवाय चीन दीर्घकाळ टिकाव धरू शकत नाही,' असे या वृत्तपत्राने म्हटले आहे.

'जिनपिंग कम्युनिस्ट पक्षाच्या आणि चीनच्या आगामी शंभर वर्षांच्या कायापालटाचे स्वप्न पाहात आहेत. अर्थात, ते पूर्ण करण्यासाठी चीनला तथाकथित मध्यम उत्पन्नाचा सापळा, नावीन्याचा अभाव आणि वेगाने वार्धक्याकडे जाणारी लोकसंख्या या पूर्वीच्याच आव्हानांना तोंड द्यावे लागणार आहे,' असे भाकीत मिशिगन विद्यापीठातील राज्यशास्त्राच्या प्राध्यापिका एव्हलीन चेंग यांनी 'सीएनबीसी'च्या वृत्तसंकेतस्थळावरील लेखात केले आहे.

# कुडमुड्यांच्या कोंडीचे कौतुक!



बाजारपेठेची नियंत्रक असलेल्या 'सिक्युरिटीज् अ‍ॅण्ड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया', म्हणजे 'सेबी' या यंत्रणेने गेल्या आठवड्यात घेतलेल्या निर्णयाचे मन:पूर्वक स्वागत. हा निर्णय म्हणजे सूचिबद्ध कंपन्यांत नेमल्या जाणाऱ्या स्वतंत्र संचालक (इंडिपेण्डंट डिरेक्टर्स) नियुक्त्यांच्या नियमांतील सुधारणा. भांडवली बाजार, उद्योगांचे नियमन, त्यातील पारदर्शकता आणि सामान्य समभागधारकांचे अधिकार-हक्क आदींचे महत्त्व जाणणाऱ्या सर्वांनी या सुधारणेसाठी 'सेबी'चे आभार मानणे आवश्यक ठरते. 'देर आए, दुरुस्त आए' असा वाक्प्रचार आहे. त्यानुसार या सुधारणांसाठी मुळातच विलंब झालेला असला तरी आणखी विलंब आणि नुकसान होण्याआधी हे निर्णय घेतले गेले, हेही नसे थोडके.

हे नुकसान कसे होते हे समजून घेण्यासाठी 'द इंडियन एक्स्प्रेस'ने याच काळात चालवलेली वृत्तमाला पाहावी. विविध भारतीय कंपन्यांच्या संचालक मंडळांत हे स्वतंत्र संचालक कसे नेमले जातात याचा साद्यंत तपशील ही वृत्तमाला देते. तीवरून दिसते ते असे की, देशातील केंद्र सरकारी मालकीच्या ९८ कंपन्यांत १७२ स्वतंत्र संचालक नेमले गेले आणि त्यातील तब्बल ८६ हे सत्ताधारी भारतीय जनता पक्षाशी थेट संबंधित आहेत. खेरीज अप्रत्यक्ष संबंधित आणि निवृत्त प्रशासकीय अधिकारी वेगळेच. यावरून 'स्वतंत्र संचालक' या संकल्पनेचा किती विचका आपल्याकडे केला जातो हे दिसते. हे सत्य सर्वपक्षीय. याचा दाखला म्हणजे, २००९ साली गुजरात उच्च न्यायालयाने या संदर्भात केलेले भाष्य. जनहितार्थ दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर निर्णय देताना त्या वेळी या उच्च न्यायालयाने वास्तवदर्शन घडवले. ''सार्वजनिक मालकीच्या बँकांवर नेमल्या गेलेल्या या स्वतंत्र संचालकांच्या नियुक्त्या गुणवत्तेच्या आधारावर झालेल्या नाहीत. तर सत्ताधारी काँग्रेस आणि त्या पक्षाच्या समर्थकांना खूश करण्यासाठी त्या करण्यात आल्या आहेत,'' असे नि:संदिग्ध निरीक्षण उच्च न्यायालयाने तीत नोंदवले. म्हणजे या वास्तवात फरक झाला तो इतकाच की, तत्कालीन सत्ताधारी काँग्रेस समर्थकांची जागा विद्यमान सत्ताधारी भाजप समर्थकांनी घेतली. 'याला झाकावे आणि त्याला काढावे', तसेच हे. विरोधात असताना सुधारणांची भाषा करणारे सत्ताधारी झाले की तीच असुधारित व्यवस्था स्वत:च्या फायद्यासाठी ओरबाडतात, हे आपल्याकडील नागडे सत्य यामुळे पुन्हा दिसून आले. हे बदलायचे तर त्यासाठी पाठीचा कणानामक अवयव शाबूत असलेले नियामक हवेत. ते केव्हा मिळणार आणि मुळात आपल्या देशात ते तयार होणार की नाही असा प्रश्न असताना, 'सेबी'च्या सुधारणांनी काही प्रमाणात का असेना, आशेचा किरण दिसतो. तेवढा तर तेवढा. त्याचा आनंद साजरा करायला हवा. म्हणून हा विषय.

या नव्या नियमावलीनुसार या स्वतंत्र संचालकांची निवड प्रस्थापितांना वाटेल तशी करता येणार नाही. या निवडीचा प्रस्ताव समभागधारकांच्या बैठकीत मंजूर व्हायला हवा. आताही ही पद्धत आहे. यात बदल हा की, या निवडीस यापुढे ७५ टक्के समभागधारकांचे अनुमोदन आवश्यक असेल. म्हणजे 'मम्' म्हणण्यापुरता हा ठराव मंजूर करवून घेण्याच्या उपचाराने भागणार नाही. हा नियम या संचालकांच्या नियुक्तीप्रमाणेच त्यांना पदावरून दूर करणे वा त्यांची फेरनियुक्ती यासाठीही आवश्यक असेल. यात त्यांच्या मानधनाचाही समावेश आहे. 'आले बाबाजींच्या मना' अशा तऱ्हेने त्यांना ना नेमता येईल, ना त्यांना हवे तितके मानधन देता येईल. याचा अर्थ, सामान्य भागधारकांच्या मतास यामुळे महत्त्व येईल. 'मायनॉरिटी शेअरहोल्डर्स' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या समभागधारकांना सध्या कोणीही वाली नसतो. एरवीही आपल्याकडे बहुमताधिक्यांची दांडगाई असतेच. त्याचे प्रतिबिंब आर्थिक जगतातही दिसते. 'आम्हास जाब विचारणारे तुम्ही कोण' असाच प्रस्थापितांचा आवेश. कंपनी विश्वात तो तसा यापुढे राखून चालणारे नाही. हे इतकेच नाही.

तर समजा, या स्वतंत्र संचालकांनी पदत्याग केल्यास त्याचे राजीनामापत्र पूर्णपणे सर्व समभागधारकांस उपलब्ध करून द्यावे लागेल. त्यानंतर होणाऱ्या कंपनीच्या नियोजित सर्वसाधारण सभेत वा तीन महिन्यांच्या मुदतीत त्यावर सर्व ती चर्चा घडणे आवश्यक ठरेल. बऱ्याचदा कंपनीतील गटबाजी वा व्यवस्थापनाचे गैरव्यवहार न पटून काही स्वतंत्र संचालक (क्वचित) पदत्याग करतात. पण चतुर व्यवस्थापन त्याच्या पदत्यागाची कारणे उघड करत नाही. यापुढे तसे करता येणार नाही. तसेच या स्वतंत्र संचालकांची नियुक्ती यापुढे अत्यंत पारदर्शीपणे करावी लागेल. त्यासाठीच्या निवड समितीने या पदासाठी आवश्यक अर्हता, गुणवत्ता यांचे निकष जाहीर करणे बंधनकारक असेल. म्हणजे उगाच कोणी टिनपाट लोकप्रतिनिधी म्हणवून घेणाऱ्याची वर्णी महत्त्वाच्या कंपन्या, बँका आदींच्या संचालक मंडळावर लावता येणार नाही. ज्याची नियुक्ती स्वतंत्र संचालक म्हणून केली जाणार आहे त्या महाभागाची पात्रता काय, त्याचे अभ्यास विषय, संबंधित क्षेत्रातील त्याचा अनुभव वगैरे मुद्दे जाहीरपणे स्पष्ट करून सांगावे लागतील.

यातील आणखी एक महत्त्वाचा बदल म्हणजे, कंपनी प्रवर्तकांच्या अन्य आस्थापनांतील निवृत्त वा पदमुक्त ज्येष्ठ कर्मचाऱ्याची नियुक्ती त्याच प्रवर्तकाच्या अन्य कंपन्यांत स्वतंत्र संचालक म्हणून लगेच करता येणार नाही. त्यासाठी पदमुक्तीनंतर तीन वर्षांचा 'शीतकाल' (कूलिंग-ऑफ पीरियड) आवश्यक. ही बाब फारच महत्त्वाची. अनेक सरकारी आस्थापनांत तर मर्जीतील अधिकारी निवृत्त झाल्या झाल्या अशा संचालकपदी नेमले जातात. हा सरळ सरळ त्या पदाचा गैरवापर असतो. तो बिनदिक्कतपणे आपल्याकडे पिढ्यान्पिढ्या सुरू आहे. सूचिबद्ध कंपन्यांत तरी यापुढे त्यास आळा बसेल. वास्तविक ही सुधारणा न्यायाधीश आदींसही हवी. ज्या व्यवस्थेत सरन्यायाधीशासारख्या वा मुख्य निवडणूक आयुक्तासारख्या सर्वोच्च घटनात्मक पदावरील व्यक्ती निवृत्तीनंतर एक साधी खासदारकी वा टिचभर राज्याचे राज्यपालपद स्वीकारण्यात धन्यता मानते, त्या व्यवस्थेत अशी सुधारणा आवश्यक. अशा कठोर नियमनानेच जनतेचे हित आणि प्रस्थापितांचे हितसंबंध यांतील सीमारेषा वा संतुलन राखणे शक्य होईल. हे जसे निकोप समाजजीवनासाठी आवश्यक आहे, तसेच उद्योगजगतातील प्रामाणिकतेसाठीही गरजेचे आहे. अनेकदा खासगी कंपन्यांचे प्रवर्तक आपलेच नातेवाईक वा ज्येष्ठ कर्मचाऱ्यांचे जोडीदार वगैरेंस स्वतंत्र संचालकपदी नेमतात. हेतू हा की, एकमेकांनी एकमेकांच्या हिताचे रक्षण करावे.

त्यात सामान्य गुंतवणूकदारांचे हित नेहमीच दुर्लक्षित राहते. वास्तविक हा स्वतंत्र संचालक या संकल्पनेचाच अपमान होता. या स्वतंत्र संचालकांनी कंपनीचे प्रवर्तक आणि अन्य हितसंबंधी यांच्या उद्यमशीलतेचा आदर करीत सामान्य गुंतवणूकदारांच्या हितांचे रक्षण करणे अपेक्षित होते. पण ते उद्दिष्ट कधीच दूर फेकले गेले. त्याची जागा प्रवर्तकांचे हितरक्षण करून आपलेही उखळ पांढरे करणे या उद्दिष्टाने घेतली. अर्थात, यातही आपले काम प्रामाणिकपणे करणारे स्वतंत्र संचालक आहेतही. पण ते स्वयंप्रेरणेने तसे आहेत. व्यवस्थेची आखणी करताना नियमन हे स्वयंप्रेरणेवर सोडून चालत नाही. ही प्रेरणा शाश्वत आणि सर्वाठायी असेलच असे नाही. म्हणजे प्रामाणिकपणे वागणे ही एखाद्याची निवड असून चालत नाही. व्यक्तीस प्रामाणिकपणे वागण्यास भाग पाडणारी व्यवस्था आधी निर्माण करावी लागते. मग त्यातूनच नियमांचे पालन ही सवय बनलेला समाज तयार होतो. म्हणून लोकशाही असो वा उद्योगविश्व-शाश्वत असायला हवे ते नियमन. अन्यथा व्यवस्था कुडमुड्यांहाती जाते. उद्योगजगतापुरता का असेना, 'सेबी'च्या नियमनाने भांडवलशाहीतील कुडमुड्यांची कोंडी होईल, म्हणून त्याचे कौतुक. हे नवे नियम १ जानेवारी २०२२ पासून अमलात येतील. ते तसे यावेत यासाठी सुज्ञांनी 'सेबी'स बळ देणे आवश्यक आहे.

# 5 वर्षीय नातीवर बलात्कार करणाऱ्या नराधम आजोबाला 20 वर्षांची शिक्षा



सांगली : स्वतःच्या नातीवर बलात्कार करून रक्ताच्या नात्याला काळीमा फासणाऱ्या नराधम आजोबास २० वर्षे सक्त मजुरीची शिक्षा सुनावण्यात आली आहे. आरोपी आजोबा नामदेव विठोबा जाधव (वय ६५) याला २० वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा अतिरिक्त जिल्हा आणि सत्र न्यायाधीश एस. एम. चंदगडे यांनी सुनावली. बलात्कार व बाल लैगिंक अत्याचार प्रतिबंधक कलमानुसार ही सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली.

याबाबत अधिक माहिती अशी की, पीडित मुलीचे कुटुंबीय जालना येथून शिराळा परिसरात ऊस तोडणीसाठी आले होते. २० डिसेंबर २०१८ रोजी सकाळी १० च्या सुमारास पीडित मुलीचे आई-वडील ऊस तोडणीसाठी गेले होते. तीन लहान मुलांची जबाबदारी त्यांनी आजोबा नामदेव जाधव याच्यावर सोपवली होती. रात्री ८ च्या सुमारासा धुमाळवाडी येथे असणाऱ्या खोपीमध्ये नामदेव जाधवने ५ वर्षे वयाच्या नातीवर लैंगिक अत्याचार केला.

दुसऱ्या दिवशी सायंकाळी ५.३० च्या सुमारास सर्व कुटुंब दुसऱ्या गावी ऊस तोडीसाठी निघाले असताना पीडित मुलीने तिला त्रास होत असल्याची माहिती आईला दिली.

२२ डिसेंबरला पीडित मुलीला घेऊन आई-वडील दवाखान्यात गेले त्यावेळी मुलीवर लैंगिक अत्याचाराचा प्रकार झाल्याची माहिती डॉक्टरांनी दिली. कोल्हापूर येथील वैद्यकीय तपासणीत बलात्कार झाल्याचे स्पष्ट झाले. याबाबतची फिर्याद कोडोली पोलिस ठाण्यात नोंद करण्यात आली होती.

पीडित मुलीच्या वडिलांनी विचारणा केल्यानंतर आजोबांनीच नातीवर बलात्कार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला.

# नाशिक : ॲपद्वारे रौलेट जुगार खेळवणाऱ्यांना अटक

मोबाइलवरील 'फनगेम' नावाच्या ॲपद्वारे रोलेट जुगारासाठी पॉइंट व आयडी पुरवणारे व इतरांना जुगार खेळवणाऱ्या दोघांना भद्रकाली पोलिसांनी जेरेबंद केले. त्याच्याकडून पाच हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सिद्धांत गुलाबराव शिराळ व मनोज बैरागी (२४, रा. पंचशीलनगर, भद्रकाली) असे अटक केलेल्या संशयिताचे नाव आहे. पंचशीलनगरमधील खंडेराव मंदिराशेजारी रस्त्याच्याकडेला हा




उद्योग सुरू होता. संशयितांकडून मोबाइल व पाच हजार २५० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. भद्रकाली पोलिसांनी गुन्ह्याची नोंद केली असून, अधिक तपास पोलिस हवालदार वाय. एस. पाटील करीत आहेत.

सिव्हिलच्या आवारातून दुचाकी चोरी

शासकीय जिल्हा रुग्णालयाच्या पार्किंगमध्ये पार्क केलेली दुचाकी चोरट्यांनी चोरून नेली. या प्रकरणी मुकुंद लक्ष्मण रणशिंगे (४४) यांनी तक्रार दिली. रणशिंगे हे उपचार घेणाऱ्या रुग्णांना भेटण्यासाठी जिल्हा रुग्णालयात आले होते. त्यांनी त्यांची मोपेड (एमएच १५ बीडी ०११९) ही येथील पार्किंगमध्ये पार्क केली होती. या प्रकरणी सरकारवाडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मुंबईतील गँगस्टर सोनू पठाण मैत्रिणीला भेटायला आला अन् फसला

मुंबई : दक्षिण मुंबईतील डोंगरी भागात असलेल्या ड्रग फॅक्टरीच्या संबंधात नारकोटिक्स कंट्रोल ब्युरोने (एनसीबी) सोमवारी एका गुन्हेगाराला अटक केली आहे. यंदाच्या जानेवारीमध्ये या ड्रग्ज कंपनीचा उलगडा झाला होता. त्यानंतर आज या प्रकरणातील आरोपीला अटक करण्यात आली आहे.मुंबईतील गँगस्टर सोनू पठाण असं या आरोपीचं नाव आहे. सगळ्यात विशेष बाब असून त्याची कसून चौकशी करण्यात येणार असल्याची माहिती आहे.संबंधित अधिकारी म्हणाले की, एनसीबीने पठाणला चौकशीला हजर राहण्यासाठी अनेकदा समन्स बजावला होता. परंतु त्याने कोणताही प्रतिसाद दिला नाही. पठाण एका मैत्रिनीला भेटण्यासाठी येत असल्याची माहिती मिळाल्यानंतर एजन्सीने त्या भागात छापा टाकून त्याला अटक केली.याआधीही



म्हणजे मैत्रिणीला भेटण्यासाठी आला असता तो एनसीबीच्या जाळ्यात अडकला. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून पोलीस आरोपीची चौकशी करणार असल्याची माहिती समोर येत आहे.

एनसीबीच्या एका अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, आरोपी जामन हिदायतुल्ला खान उर्फ सोनू पठाण याला एनसीबीच्या पथकाने पायधोनी भागात पहाटे अटक केली. तो सध्या अधिकाऱ्यांच्या ताब्यात एजन्सीने या प्रकरणात चिंकू पठाण उर्फ परवेझ खान आणि फरार अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमचा साथीदार आणि दिवंगत माफिया डॉन करीम लालाचा नातेवाईक आरिफ भुजवाला यांना अटक केली होती. जानेवारीमध्ये झालेल्या कारवाईत एनसीबीने 5.375 किलो मेफेड्रोन (एमडी), 6.126 किलो एफेड्रिन, 990 ग्रॅम मेथाम्फॅटामिन, 2 कोटी रुपयांहून अधिक रोख रक्कम आणि दोन शस्त्रे जप्त केली होती.

# वर्षभरात १६० माओवादी ठार; संघटना साजरा करणार शहीद सप्ताह

गेल्या अनेक वर्षांपासून दंडकारण्यासह देशाच्या माओवाद प्रभावित भागात माओवाद्यांच्या हिंसक कारवाया सुरू आहेत. सुरक्षा दल आणि माओवादी यांच्यातल्या संघर्षात व करोनाचा माओवाद्याना गेल्या वर्षभरात मोठा हादरा बसला असून यामुळे संघटनेचे कशा पद्धतीने नुकसान झाले आहे याचा लेखाजोखा माओवाद्यांच्या केंद्रीय समितीने पत्रामधून उघड केला आहे. गेल्या वर्षभरात विविध चकमकींसह इतर कारणांमुळे तब्बल १६० माओवाद्यांचा मृत्यू झाल्याची कबुली माओवाद्यांनी पत्रांमधून दिली आहे. गेल्या वर्षभरात दंडकारण्यात सुरक्षा दलासोबत झालेला संघर्ष, करोनामुळे माओवादी संघटनेवर पडलेला प्रभाव, देशभरातल्या अनेक मोठ्या घटनांसंदर्भात माओवाद्यांची भूमिका, माओवादी चळवळीचे झालेले नुकसान यासह अनेक मुद्यांवर माओवाद्यांच्या केंद्रीय समितीने तब्बल १८ पानांचे एक पत्र जारी केले आहे. या पत्रातून देण्यात आलेल्या माहितीनुसार तब्बल तीस महिला माओवाद्यांचा मृत्यू झाला असून एकट्या गडचिरोली



जिल्ह्यात देशभराच्या तुलनेत सर्वाधिक २८ माओवादी पोलिसांच्या चकमकीत ठार झाले आहेत. सुरक्षा दलांसोबत लढत असताना झालेल्या चुका टाळून क्रांतीसाठी संघर्ष करण्याचे आवाहन माओवाद्यांच्या कॅडरला केले आहे. त्याचप्रमाणे २८ जुलैचा शहीद सप्ताह साजरा करण्याचे आवाहनही पत्रात करण्यात आले आहे. वर्षभरात दंडकारण्यासह देशभरात तब्बल १६० माओवाद्यांचा मृत्यू झाला असून यात पोलिस आणि माओवादी यांच्यात झालेल्या चकमकीत तब्बल ९५ माओवादी ठार झाल्याचा उल्लेख आहे. बिहार, झारखंडमध्ये ११ ओरिसात १४, एमएमसीमध्ये ८, तेलंगणात १४ आणि दंडकारण्यामध्ये १०१ माओवाद्यांचा मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये ३० महिला माओवाद्यांचा समावेश असून सर्वाधिक महिला माओवादी या गडचिरोली जिल्ह्यात मृत्युमुखी पडल्या आहेत. माओवाद्यांच्या केंद्रीय समितीच्या या पत्रामध्ये करोना महामारीसह काही अपघाताच्या घटनांमध्ये तेरा माओवाद्यांचा मृत्यू झाल्याचे सांगत जहालवादी नेता हरीभूषण च्या नावासह सविस्तर विश्लेषण माओवाद्यांनी या पत्रातून केले आहे. याशिवाय ७२ माओवादी ठार झालेले आहेत, त्याची माहिती उपलब्ध नसल्याचे स्पष्ट करत याबाबत सविस्तर पुढच्या काळात सांगू असे माओवाद्यांनी स्पष्ट केले आहे.

# कंत्राटी आरोग्य कर्मचाऱ्यांवर पोलिसांचा सौम्य लाठीमार



करोनाच्या प्रादुर्भावाच्या काळातील सेवेची दखल घेऊन, सरकारी सेवेत कायमस्वरूपी सामावून घ्यावे, अशी मागणी करून, उपमुख्यमंत्र्यांच्या ताफ्यासमोर बीडमध्ये ठिय्या मांडलेल्या कंत्राटी आरोग्य कर्मचाऱ्यांवर सौम्य लाठीमार करण्यात आला.

करोना प्रादुर्भाव नियंत्रण आणि जिल्हा खरीप हंगाम आढावा बैठकीसाठी उपमुख्यमंत्री अजित पवार, आरोग्यमंत्री राजेश टोपे आणि पालकमंत्री धनंजय मुंडे आले होते. त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेतली. करोनाकाळातील सेवेची दखल घेऊन कायमस्वरूपी शासकीय सेवेत सामावून घ्यावे, अशी कंत्राटी आरोग्य कर्मचाऱ्यांची मागणी होती. पाच कर्मचाऱ्यांच्या शिष्टमंडळाने भेट घेऊन उपमुख्यमंत्री अजित पवार यांना निवेदनही दिले. बैठक संपवून अजित पवार यांच्या वाहनांचा ताफा उस्मानाबाद जिल्ह्यातील भूमकडे जात असताना विश्रामगृहासमोर जमलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांनी त्यांना भेटण्याची मागणी करून, रस्त्यावर ठिय्या दिला आणि वाहनांचा ताफा अडवला. त्यामुळे पोलिसांनी आंदोलक आरोग्य कर्मचाऱ्यांना पांगवण्यासाठी सौम्य लाठीमार केला. कोरोनाकाळात आम्हाला कामावर घेतले आणि तीन महिन्यांच्या आत कामावरून काढून टाकले, असा आरोप आंदोलकांनी केला. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणाव निर्माण झाला होता. 'उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे गाऱ्हाणे मांडण्यास जाणाऱ्या महिला आरोग्य कर्मचाऱ्यांना पोलिसांनी केलेली धक्काबुक्की आणि लाठीमार संतापजनक आहे.

# म्हणून मी मुख्यमंत्र्यांना 'ते' पत्र लिहिलं होतं; प्रताप सरनाईक यांचा खुलासा

मुंबई: 'भाजपशी पुन्हा जुळवून घ्या' असं पत्र मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना लिहून खळबळ उडवून देणारे शिवसेनेचे आमदार प्रताप सरनाईक आज पावसाळी अधिवेशनाच्या निमित्तानं प्रथमच मीडियासमोर आले. मुख्यमंत्र्यांना आपण ते पत्र का लिहिलं होतं, याचा खुलासाही त्यांनी आज केला.

महाविकास आघाडीतील मित्र पक्ष काँग्रेस व राष्ट्रवादीवर आरोप करत सरनाईक यांनी काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्री ठाकरे यांना पत्र लिहिलं होतं. केंद्रीय तपास यंत्रणांकडून सतत त्रास दिला जात आहे. या त्रासातून सुटका करून घेण्यासाठी भाजपशी पुन्हा जुळवून घ्या, अशी विनंती सरनाईक यांनी मुख्यमंत्र्यांना केली होती. त्यामुळं राज्याच्या राजकारणात खळबळ उडाली होती. सत्ताधारी व विरोधी पक्षाच्या नेत्यांकडून विविध प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आल्या होत्या. मात्र, तेव्हापासून सरनाईक एकदाही मीडियापुढं आले नव्हते. आज मीडियाशी बोलताना त्या पत्राबाबत खुलासा केला.



'महाविकास आघाडीचं सरकार स्थापन होत असतानाच्या सर्व घडामोडींमध्ये मी आणि माझी दोन्ही मुलं होती. सरकार स्थापनेच्या घडामोडी सुरू असताना तिन्ही पक्षाच्या आमदारांची व्यवस्था पाहत होतो. सरकार आल्यानंतर ज्या-ज्या वेळी महाविकास आघाडीवर विरोधकांनी आरोप केले, तेव्हा पक्षाचा एक प्रवक्ता म्हणून उत्तरं देण्याचं कामही मी केलं होतं. अर्णव गोस्वामी, कंगना राणावत प्रकरणातही मी आक्रमकपणे सरकारची बाजू मांडत होतो. त्यामुळं मी विरोधकांच्या हिटलिस्टवर आलो. कारण नसताना माझ्या मागे ईडीची चौकशी लावण्यात आली. अशा वेळी माझ्या महाविकास आघाडीच्या नेत्यांनी माझ्या मागे राहायला हवं होतं. माझा पक्ष आणि पक्षप्रमुख ठामपणे माझ्या मागे उभा होता. पण सरकार म्हणून महाविकास आघाडी माझ्या मागे नव्हती. मीरा-भाईंदरमध्ये भाजपचे माजी खासदार किरीट सोमय्या व त्यांच्या मुलानं केलेल्या भ्रष्टाचाराचं प्रकरण मी विधानसभेत लावून धरलं होतं. त्यावरही कारवाई झाली नाही. त्यामुळं उद्विग्न होऊन मी पत्र लिहिलं होतं,' असं सरनाईक म्हणाले. मात्र, आता तो विषय संपला आहे, अशी पुस्तीही त्यांनी जोडली.

# राज्यातील 'या' शहरात तुफान दगडफेक; 250 जणांवर गुन्हा दाखल, 18 ताब्यात



नांदेड : अर्धापूर शहरात एका जिममध्ये बुधवारी रात्री वेगवेगळया धर्मातील काही युवकांमध्ये झालेल्या किरकोळ वादावरून शहरामध्ये तुफान दगडफेक झाली. सदरील जिमचे नाव आर. के. जिम असून जिममध्ये किरकोळ वाद झाला होता. त्यानंतर शहरातील मारोती मंदिर चौकात दोन गटात तुफान दगडफेक झाली. यावेळी पोलिसांच्या गाड्यांसह मोठ्या प्रमाणात चार चाकी व दोन चाकी वाहनाचे नुकसान झालं आहे. जमाव पांगवण्यासाठी पोलिसांना अक्षरशः अश्रूधुराच्या नळकांड्या फोडाव्या लागल्या.

पोलिसांनी दोन्ही गटातील तब्बल अडीचशे जणांविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत. त्यातल्या १८ जणांना पोलिसांनी ताब्यात घेतलं. सध्या अर्धापूर इथं तणावपूर्ण शांतता आहे.

याप्रकरणी विशेष पोलीस महानिरीक्षक निसार तांबोळी म्हणाले की, 'या प्रकरणात गुन्हेगारांना पाठिशी घालणार नाही. अर्धापूर दगडफेक प्रकरणात सखोल चौकशी करून योग्य ती कडक कार्यवाही केली जाईल.' दरम्यान, या हिंसाचार प्रकरणी आता कायदेशीर कार्यवाही सुरू आहे. सध्या शहरात सर्वत्र शांतता आहे. शहरातील नागरिकांनी आपापली नियमित कामे सुरू करावीत. या प्रकरणी कोणीही कसल्याही प्रकारच्या अफवा पसरवू नयेत. नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये. काही अडचण असेल तर थेट पोलिसांशी संपर्क साधावा', असं आवाहन पोलिस अधीक्षक प्रमोदकुमार शेवाळे यांनी केलं आहे.

# पोलिसांनी उलगडलं खुनाचं रहस्य; पुरावे नसतानाही 8 दिवसांत लावला हत्येचा छडा



नंदुरबारः तालुक्यातील भालेर येथे शनिवारी अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळून आला होता. काही पुरावे नसतानाही गुन्ह्याच्या उलगडा करण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर होते. परंतु, अवघ्या ८ दिवसांत या गुन्ह्याच्या उलगडा पोलिसांनी लावून तीन संशयितांना ताब्यात घेतले आहे.

तालुक्यातील भालेर येथे २६ जून रोजी एक अनोळखी पुरुषाचा मृतदेह आढळला होता. यावरून अज्ञातांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी अधिक तपास केला असता मयत इसम पश्चिम बंगाल येथील जलपाईगुडी येथील होता. घटनास्थळावर मयताची ओळख पटू शकेल असे कोणत्याही प्रकारचे पुरावे सापडले नव्हते. त्यामुळे गुन्ह्याचा छडा लावण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर होते. स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने गुन्ह्याचा तपास आपल्या हाती घेतला होता.

एका गुप्त बातमीदाराने दिलेल्या माहितीनुसार २५ जून रोजी रात्रीच्या सुमारास भालेर जवळील आश्रमशाळेजवळ दोन ते तीन व्यक्ती एका तरुणाला मारहाण करीत असल्याची माहिती समोर आली होती. त्यावरून पोलिसांनी तपास सुरू केला होता. तपासानंतर ३ संशयित नंदुरबार तालुक्यातील भालेर या गावातील रहवाशी असल्याची माहिती पोलिसांच्या हाती लागली. त्यांना पोलिसांनी ताब्यात घेऊन पोलीसी खाक्या दाखवताच त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली.रस्त्यावर वाहनाला साईट देण्याच्या कारणावरून मयत आणि आरोपींमध्ये वाद झाला. हा वाद आणखी वाढत गेला आणि त्या वादातून त्यांनी खून केल्याची माहिती स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक रविंद्र कळमकर यांनी दिली आहे.

# नोकरी मिळत नसल्याच्या नैराश्यातून तरुणाची आत्महत्या

नाशिकरोड : अभियांत्रिकीचे व्यावसायिक उच्च शिक्षण घेतल्यानंतरही रोजगाराचा प्रश्न सोडवण्यासाठी नोकरी मिळत नसल्याने आलेल्या नैराश्यातुन अभियंता असलेल्या अक्षय परशराम ढोली (वय २४, रा. डुबेरे, ता. सिन्नर) या युवकाने राहत्या घरात आत्महत्या केल्याची घटना शनिवारी सायंकाळी चार वाजेच्या दरम्यान घडली. अक्षयने दोन वर्षांपूर्वीच अभियांत्रिकीची पदवी मिळवली होती. उच्च शिक्षण पूर्ण झाल्यानंतर अक्षय नोकरीच्या शोधात होता. परंतु




अपेक्षित नोकरी प्राप्त न मिळाल्याने तो गेल्या काही दिवसांपासून चिंताग्रस्त होता. अभियंता झाल्यानंतरही तो आपल्या कुटुंबाला आर्थिक हातभार लागावा यासाठी शेतातील मिळेल ती कामेही करीत होता.

# पुणे । प्रियकराच्या मदतीने पत्नीने केली पतीची हत्या; कात्रज घाटात फेकला होता मृतदेह!




अनैतिक प्रेमसंबंधात अडसर ठरणाऱ्या पतीचा एका महिलेने आपल्या प्रियकराच्या मदतीने खून केल्याची घटना समोर आली आहे. या महिलेचे एका महाराजासोबत प्रेमसंबंध होते, ही माहिती तिच्या पतीला समजल्याने पती-पत्नीमध्ये नेहमी वाद होत असत. अखेर प्रेमसंबंधात अडसर ठरणाऱ्या आपल्या पतीचा या महिलेने प्रियकराच्या मदतीने खून केला. या प्रकरणी मृत व्यक्तीच्या पत्नीसह चौघांना अटक करण्यात आली आहे.

आनंद गुजर असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव असून, त्यांची पत्नी सरोज गुजर, रमेश कुंभार (रा. वाल्हेकरवाडी), यश योगेश निकम आणि अनिकेत ऊर्फ अमोल रामदास बडदम या चौघांना या खून प्रकरणात अटक करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कात्रज घाटात काल(शनिवार) एका व्यक्तीचा मृतदेह आढळल्याची माहिती मिळाली. त्यानुसार घटनास्थळी पाहणी केल्यावर, तिथे एक दुचाकी आढळून आली. त्या दुचाकीच्या नंबरवरून आम्ही शोध घेण्याचा प्रयत्न केला. मात्र तो नंबर बनावट असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर चासीवरून ही दुचाकी मृत आनंद गुजर यांची असल्याचे स्पष्ट झाले. तसेच पोलिसांनी सांगितले की, या घटनेचा तपास सुरू असताना. आम्हाला समजले की, मृत आनंद यांच्या पत्नीचे महाराज असलेल्या रमेश कुंभार याच्याशी अनैतिक संबंध असल्याची माहिती त्यांना मिळाली होती. यावरून दोघांमध्ये सतत वाद झाल्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे पत्नी सरोज ही रमेश कुंभार याच्या सोबत राहत होती. तर पती आनंद गुजर हा महाराज असलेल्या रमेश कुंभार याच्या मठात गेला होता. तेव्हा पत्नी आणि रमेश कुंभार सोबत त्याचा वाद झाला. त्यामध्ये तेथील महाराज, पत्नी आणि दोघांनी आनंद याला मारहाण केली. ज्यामध्ये त्यांचा जागीच मृत्यू झाला. यानंतर चौघांनी आनंदा गुजर यांचा मृतदेह कात्रज घाटात आणून टाकला आणि त्यांची दुचाकी मृतदेहाच्या बाजूला लावून निघून गेले. आनंद यांचा अपघाती मृत्यू झाल्याचा बनाव करण्याचा प्लॅन त्यांचा होता. पण त्यांचा बनाव काही तासात उघड करण्यात पोलिसांना यश आले. असे भारती विद्यापीठ पोलिसांनी सांगितले असून चौघांना अटक करण्यात आली आहे.

# महसूल विभागाची मोठी कारवाई, नवी मुंबईतून जप्त केले येथून 300 कोटींचे ड्रग्ज



नवी मुंबई : नवी मुंबईमध्ये महसूल विभागाने भरीव कारवाई करत 300 कोटी रुपयांची ड्रग्ज जप्त केली आहेत. महसूल विभागाने 300 कोटी रुपयांची 290 किलो हेरॉईन जप्त केल्याची माहिती समोर आली आहे. नवी मुंबईतील उरणमधील जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट (J N P T) मधून हेरॉईनचा हा प्रचंड साठा जप्त करण्यात आला आहे. सीमाशुल्क विभागाने आता हे प्रकरण एंटी-स्मगलिंग इंटेलिजेंस, इन्व्हेस्टिगेशन अॅण्ड ऑपरेशन्स एजन्सी कडे सोपवला आहे. या प्रकरणात डीआरआय दोन लोकांची चौकशी करत असल्याची माहिती आहे.

नवी मुंबईच्या उरण येथून एंटी-स्मगलिंग इंटेलिजेंस, इन्व्हेस्टिगेशन अॅण्ड ऑपरेशन्स एजन्सीकडून 300 कोटी रुपयांची ड्रग्स जप्त करण्यात आली असून यावर्षी पकडण्यात आलेल्या हेरॉईनचा सर्वात मोठा साठा आहे. जेएनपीटी बंदराच्या सीमाशुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी 290 किलो हेरोइन जप्त केली आहे. याप्रकरणी पुढील तपास सुरू आहे.

याआधीही जप्त केली होती 191 किलो हेरॉइन

मागील वर्षीही डीआरआयने 191 किलो हेरॉईन जप्त केली होती.

तपासणीत करताना आढळलेले डोळ्यात धूळ टाकण्याचे आयुर्वेदिक औषध असल्याचे समोर आले होते. पंजाब पोलिसांच्या स्पेशल टास्क फोर्सने अमृतसर जिल्ह्यातील एका घरातून 191 किलो हेरॉइन आणि इतर वस्तू जप्त केल्या आहेत. या भागामध्ये दोन अफगाण नागरिकांबाबत 6 जणांना अटक करण्यात आली होती.

दरम्यान, ईशान्य भारतातही ड्रग्सच्या तस्करीचा एक नवीन धोका समोर आला आहे. म्यानमारमधून अमली पदार्थांची तस्करी करण्याचे पारंपारिक मार्ग बांगलादेश सुरक्षा दलांद्वारे जोरदारपणे राबविले जात आहेत. यात इस्लामिक विद्यार्थी संघटनांचा सहभागही आढळला आहे. सुरक्षा आणि गुप्तचर संघटनांनी तयार केलेल्या अहवालात असे म्हटले आहे.

म्यानमार येथून अमली पदार्थांची तस्करी होत असल्याची माहिती आता मणिपूरमार्गे आणि तेथून सिलचर आणि त्रिपुरामार्गे बांगलादेशात पोहोचली आहे.

# ब्लॅक फंगसमुळे एसपीयूतील जवानाची पिस्तुलातून गोळी झाडून आत्महत्या



नागपूर: ब्लॅक फंगसमुळे डोळा निकामी झाल्याने विशेष सुरक्षा पथकातील (एसपीयू) जवानाने पिस्तूलातून गोळी झाडून आत्महत्या केली ही थरारक घटना शनिवारी दुपारी ३ वाजताच्या सुमारास झिंगाबाई टाकळीतील निवारा हाऊसिंग सोसायटी येथे घडली. या घटनेने पोलिस दलात प्रचंड खळबळ उडाली आहे. प्रमोद शंकरराव मेरगुवार वय ४६,असे मृतकाचे नाव आहे. प्रमोद हे मूळ ग्रामीण पोलिस दलात तैनात आहेत. काही वर्षांपूर्वी ते प्रतिनियुक्तीवर एसपीयूत आले. दरम्यान त्यांना करोना झाला. करोनानंतर ब्लॅक फंगसने त्यांच्या डोळ्याला इजा झाली. आधी त्यांच्यावर अॅलेक्सिस हॉस्पिटलमध्ये उपचार करण्यात आले. त्यानंतर त्यांना हैदराबाद येथेही पुढील उपचारासाठी पाढविण्यात आले. त्यांचा एक डोळा निकामी झाला.दरम्यान त्यांच्या दुसऱ्या डोळ्यालाही त्रास होऊ लागली. ते प्रचंड तणावात राहायला लागले. वेदना असह्य होत होत्या. शनिवारी दुपारी प्रमोद यांनी पिस्तूलातून गोळी झाडून आत्महत्या केली. घटनेची माहिती मिळताच पोलिस उपायुक्त विनीता शाहू, सहाय्यक पोलिस आयुक्त सुधीर नंदनवार, मानकापूर पोलिस स्टेशनच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षक वैजयंती मंडवधरे आदींसह पोलिसांचा ताफा तेथे पोहोचला.

# लाकडी खेळणींच्या नावाखाली कुरियरमधून मागवल्या तलवारी अन् गुप्त्या!



औरंगाबादमध्ये कुरियरने मागविलेल्या ४१ तलवारी, सहा कुकरी, दोन गुप्त्यांसह एक माल वाहतूक करणारी गाडी असा सुमारे २ लाख ४५ हजार २५० रुपयांचा ऐवज पुंडलिकनगर आणि जिन्सी पोलिसांनी संयुक्तरित्या कारवाई करत जप्त केला. तसेच ही हत्यारं मागविणाऱ्या इरफान खान ऊर्फ दानिश अय्युब खान (२०, रा. जुना बायजीपुरा) याला रविवारी ४ पहाटे बेड्या ठोकल्या आहेत.

आरोपी इरफान ऊर्फ दानिश खान याला न्यायालयात हजर करण्यात आले असता, ९ जुलैपर्यंत त्याला पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी व्ही.एच. खेडकर यांनी दिले.

बायजीपुरा येथील इंदिरानगरच्या इरफान ऊर्फ दानिश खानच्या नावावर हिना किराणा स्टोअर्स या पत्त्यावर कुरियरने अमृतसर येथील अरमान इंटरप्राईजेसकडून लाकडी खेळण्याच्या नावाखाली तलवारी येत असल्याची माहिती पुंडलिकनगर पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक घनश्याम सोनवणे यांना मिळाली.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव ( पूर्व ), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर ( पूर्व ), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. ( सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ).संपर्कः-9594418181 / 8424989898